# <u>नियोजन विभागाची संरचना</u>

मा. मंत्री (नियोजन) व मा. राज्यमंत्री (नियोजन) हे नियोजन विभागाचे प्रमुख तसेच प्रधान सचिव (नियोजन) हे प्रशासकीय प्रमुख आहेत.

विभागात एकूण ११ सह / उप सचिव, १० अवर सचिव व १ विशेष कार्य अधिकारी कार्यरत असून त्यांच्यामार्फत विभागीय कामकाजाचे पर्यवेक्षण केले जाते.

मंत्रालयीन इतर विभागांप्रमाणेच महाराष्ट्र शासन कार्यनियमावलीनुसार नियोजन विभागाचेही कामकाज चालते. महाराष्ट्र शासन कार्यनियमावलीच्या नियम १३ अन्वये राज्य शासनाचा प्रत्येक आदेश किंवा लेख यावर प्रधान सचिव, सह सचिव, उप सचिव, अवर सचिव किंवा त्याबाबतीत ज्यास विशेष अधिकार प्रदान करण्यात आले आहेत असा अधिकारी, याने सही केली पाहिजे आणि अशी सही ही अशा आदेशाचे किंवा लेखाचे योग्य अभिप्रमाणन असल्याचे समजले जाते. कार्यासन अधिकारी पध्दतीनुसार तसेच या पध्दतीतील फायदे-तोटे लक्षात घेऊन कार्यासन अधिकारी तसेच सहायक यांच्यामार्फत कार्यासनात आलेले सर्व संदर्भ, त्यावर टिप्पणी लेखन होऊन वरिष्ठांना सादर केले जाते.

महाराष्ट्र शासन कार्यनियमावली अनुसूची (एक) प्रमाणे प्रत्येक मंत्रालयीन विभागाला विषयांचे वाटप करण्यात आलेले असून, सदर अनुसूचीतील अनुक्रमांक १४ येथे नियोजन विभागाला नेमून दिलेल्या विषयांची यादी आहे. त्यास अनुसरुन नियोजन विभागातील प्रत्येक कार्यासनाला विषय वाटप करण्यात आले असून, त्याची यादी सोबत जोडण्यात आली आहे.

विभागास इतर मंत्रालयीन विभागाकडून सहमतीसाठी प्राप्त होणारी प्रकरणे, जनतेकडून तसेच विभागाच्या नियंत्रणाखालील कार्यालयांकडून प्राप्त होणारे संदर्भ प्रथम नियोजन विभागाच्या नोंदणी शाखेत स्विकारले जातात. नोंदणी शाखेतून प्रकरणे/संदर्भ संबंधित कार्यासनांकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविले जातात अथवा काही महत्वाची प्रकरणे अथवा संदर्भ थेट प्रधान सचिवांच्या / सह / उप सचिवांच्या नावे विभागास प्राप्त होतात. अशा प्रकारे प्राप्त झालेली प्रकरणे/संदर्भ यांची नोंद कार्यासनातील लिपिकामार्फत नोंदवहीत / संगणकीय प्रणालीवर घेतल्यानंतर कार्यासनातील कक्ष अधिकारी सदर संदर्भ प्रकरणांची तातडी लक्षात घेऊन स्वत:च्या स्तरावर अथवा सहायकाच्या स्तरावर सादर करण्याचे निदेश देतो. सहायक सदरहू पत्र अथवा प्रकरण काळजीपूर्वक वाचून त्याबाबत काही पूर्वपिठिका आहे किंवा कसे, त्याबाबतचे प्रचलित शासकीय नियम, वार्षिक योजनेतील तरतूद, इत्यादी बाबी विचारात घेऊन सदर संदर्भावर/प्रकरणावर टिप्पणी सादर करतो. सदरहू टिप्पणी कोणत्या स्तरावर निकाली काढणे आवश्यक आहे हे लक्षात घेऊन कक्ष अधिकारी, अवर सचिव, उप/सह सचिव, प्रधान सचिव (नियोजन), मा. राज्यमंत्री (नियोजन), मा. मंत्री (नियोजन) व मा. मुख्यमंत्री या साखळीने प्रकरण सादर केले जाते. ही बाब स्पष्ट करण्यासाठी नियोजन विभागाची अधिकारश्रेणी दर्शविणारा आराखडा तसेच नियोजन विभागाची मुख्य कार्ये व विभागामार्फत हाताळण्यात येणा-या विषयाबाबतची माहिती पुढील पानावर दर्शविल्याप्रमाणे आहे.

नियोजन विभागाचे सर्वंकष प्रशासकीय नियंत्रण व पर्यवेक्षण प्रधान सचिव (नियोजन) यांच्याकडे आहे.